## तक्रार युएलपी नं.१७ / २०२२

**नि.सी— २२ वरील आदेशानुसार उलटतपास सुरु...**

**उलटतपास तक्रारदार यांचेतर्फे श्री.डमाळे वकील.......**

मी तक्रारदारास ओळखतो. रेकॉर्डनुसार तक्रारदार येळे हा २०२० मध्ये कामास लागला. रेकॉर्डप्रमाणे माइया पूर्वीचे सरपंच यांनी श्री.येळे यास कामावर घेतल्याचा ठराव घेतला होता. आता मला दि. ३१.३.२०२० चा ठराव क्र. ७ ची नक्कल दाखविली. त्यावर पूर्वीचे ग्रामसेवक व सरपंच यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या ठरावानुसार तक्रारदार येळे यास पाणीपुरवठा कर्मचारी म्हणून कायम केले. त्यास नि.यु— ३३ देण्यात आले. आता मला दि. ७.९.२०२२ चा सरपंच व ग्रामसेवक यांचा आदेश दाखविण्यात आला. त्यावर पूर्वीचे ग्रामसेवक व सरपंच यांची सही आहे. तो आदेश बरोबर आहे. त्यास नि. यु—३४ देण्यात आले. आता मला दि. २९.८.२०२२ चा ठरावाचा मसुदा दाखविला. हे म्हणणे खरे आहे की दि.२९.८.२०२२ रोजी मी सरपंच पदावर नव्हतो. तक्रारदारास ठरावानुसार कुठल्याही प्रकारचा दंड केला अथवा वॉर्निंग दिली नाही व दिली असल्यास अशाप्रकारचे रेकॉर्ड ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असल्याचे मला माहीत नाही.

तक्रारदारास बेकायदेशीरपणे कमी केले आहे याची चौकशी केल्याशिवाय मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की ठरावाप्रमाणे तक्रारदार हा कायमस्वरुपी कर्मचारी होता. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदाराला काढून टाकण्यासंदर्भाने जे रेकॉर्ड उपलब्ध आहे ते चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की आपल्या मर्जीतील माणसाची नियुक्ती करण्यासाठी तक्रारदारास बेकायदेशीरित्या कमी केले आहे. सद्यस्थितीत ठरावाशिवाय दुसरा कुठलाही दस्तऐवज नाही. सध्या पाणीपुरवठा कर्मचारी म्हणून श्री. प्रदीप दत्तू बाचकर यांना तात्पुरत्या स्वरुपात घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की

येळे यास मुद्दाम काढून दुस—या कामगारास कामावर घेतले आहे.  हे म्हणणे खरे आहे की तक्रारदार हा अपक्ष म्हणून सरपंच पदास उभा होता.  हे म्हणणे खरे नाही की मुद्दामहून तक्रारदाराची आर्थीक कोंडी करण्यासाठी त्याला कामावरुन कमी केले. हे म्हणणे खरे नाही की खोटे प्रतिज्ञापत्र दिले असून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास काही नाही.

सही/—

(शरद जी. देशपांडे)
न्यायाधीश,
प्रथम कामगार न्यायालय, अहमदनगर

दि. १८.०६.२०२४.